11 JUN 2018 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्ज बुडव्यांवर दंडात्मक कारवाई गरजेची

## माजी गव्हर्नर वाय.व्ही.रेड्डी : 'बँकांची सुरक्षितता'वर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बँकेचे कर्ज बुडवणाऱ्यांना केवळ शिक्षा करून उपयोग नाही तर दंडात्मक कारवाई होणे गरजेचे आहे, असे मत रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांनी व्यक्त केले. रिझर्व्ह बँक तसेच राज्य शासन यांनी समन्वयाने काम केल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठ बँक ऑफ इंडिया अध्यासनाच्या वतीने आयोजित 'बँकांच्या सुरक्षितता' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर सौ. उषा थोरात, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ बँक ऑफ इंडिया अध्यासन आयोजित चर्चासत्रात बोलताना रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी, डावीकडून सौ. उषा थोरात, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)**

रेड्डी म्हणाले, बँका सुरक्षितच आहेत पण बँका अडचणीत आहेत अशी मानसिकता तयार केली जात आहे. १९९६ पर्यंतची बँकांची स्थिती ही दयनीय होती. अनेक बँकांच्या आर्थिक व्यवहारांच्या नोंदी योग्य पध्दतीने ठेवल्या जात नव्हत्या. बँकांची कर्जे, कर्जावरील व्याज, एनपीएची आकडेवारी उपलब्ध नव्हती. पण कालांतराने रिझर्व्ह बँकेने यासाठी प्रयत्न केले. बँकांची विश्वासार्हता, स्थैर्य व सातत्य राहण्यासाठी योजना तयार केल्या. बँकांची कार्यप्रणाली निश्चित केली. म्हणून २००८ साली जागतिक मंदीतही परदेशातील बँका बंद पडल्या पण भारतातील एकही बँक बंद पडली नाही. नागरी बँकांवर लोकांचा विश्वास आहे, तो कायम रहावा. या बँकांवर नियंत्रण करणारे सभासद असतात. त्यांनी बँका चालविण्याची पारंपरिक पध्दती बाजूला ठेवून कंपनी कायद्यानुसार बँकांचे काम चालविले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रा. विजय ककडे यांनी मानले. यावेळी डॉ. यशवंतराव थोरात, प्र.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व बँकिंग, उद्योग आदी क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

11 JUN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संदर्भमूल्य साहित्यासाठी मूळ पुस्तके वाचा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : ग्रंथ कॉर्नर पुस्तक प्रदर्शनास प्रारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सोशल मिडीयावर सहज उपलब्ध होणारे साहित्य मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पण संदर्भमुल्य साहित्य वाचायचे असल्यास मुळ पुस्तके वाचने गरजेचे आहे. अशा वाचनातून वाचकांची चांगली पीढी घडण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे ग्रंथ कॉर्नर पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी ग्रंथ प्रदर्शनांना भेटी देवून पुस्तके खरेदी करा आणि आपली घरे ग्रंथांनी समृद्ध करा, असे आवाहन यांप्रसंगी केले. कुलगुरू पुढे म्हणाले, जिल्ह्यामध्ये कला व साहित्य परंपरा मोठ्या प्रमाणात जोपासली जाते. याचाच एक भाग म्हणजे ग्रंथ कॉर्नरने भरवलेले हे पुस्तक प्रदर्शन होय.




**कोल्हापूर : राजर्षी शाहू स्मारक भवनच्या ग्रंथ कॉर्नर पुस्तकप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी दिपप्रज्वलन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, प्रभाकर पाटील, कृष्णाजी हरगुडे, ग्रंथ कॉर्नरचे संचालक सुभाष पाटील, वाचनकट्ट्याचे युवराज कदम आदी.**

यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, प्रभाकर पाटील, शाहू स्मारकचे व्यवस्थापक कृष्णाजी हरगुडे, ग्रंथ कॉर्नरचे संचालक सुभाष पाटील, वाचनकट्ट्याचे युवराज कदम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथ कॉर्नरचे उद्घाटन करण्यात आले.

पुस्तक प्रदर्शन गुरूवार (दि.२८) पर्यंत वाचकांसाठी खुले आहे. तरी याचा शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये, विद्यार्थी आदींनी लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथ कॉर्नरच्या संचालिका शुभांगी पाटील यांनी केले. प्रभाकर पाटील यांनी आभार मानले.